## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

| | |
|---|---|
| वेब साईट :- www.nanded,gov.in | ई-मेल :- nandedrdc@gmail.com |
| दूरध्वनी क्र. :- (02462) 235077 | फॅक्स क्र. :- (02462) 238500 |
| विभाग :- महसूल-1 शाखाः- गृह. | 1. Dr.Ambedkar jayanti- 2021.doc |




संदर्भ :- १) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४

२) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दिनांक १३.०४.२०२१

३) महाराष्ट्र शासन गृह विभाग परिपत्रक क्रं. आरएलपी-०४२१/प्र.क्रं-११४/विशा-१ ब, दि. २० एप्रिल, २०२१

क्रमांक २०२१-आरबी-१-डेस्क-२-टे-(४)-श्रीरामनवमी-प्र.क्र. दिनांक २० एप्रिल, २०२१.

### श्रीरामनवमी, २०२१ संबंधी मार्गदर्शक सूचना

आदेश-

ज्याअर्थी, **श्रीरामनवमी** उत्सव संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मोठया प्रमाणात व उत्साहाने साजरा केला जातो. चालू वर्षी दि. २१ एप्रिल, २०२१ रोजी श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी त्यांचे संदर्भ क्र.३ वरील परिपत्रक दिनांक २०.०४.२०२१ अन्वये कोविड-१९ च्या अनुषंगाने यावर्षी सर्व धर्मीय सण/उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. सध्या कोविड-१९ च्या दुस-या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रूग्णांच्या संख्येचा विचार करता महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन,मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ क्र.२ वरील दिनांक १३ एप्रिल, २०२१ रोजी च्या आदेशामधील मुद्दा क्र.१, २, ७ व १० मध्ये नमुद तरतुदींच्या अधिन राहून या वर्षी **श्रीरामनवमी** उत्सव साजरा करणे आवश्यक असल्याने त्यानुषंगाने खालील प्रमाणे ५ मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी संदर्भ क्रं ०३ वरील नमुद परिपत्रकाच्या अंमलबजावणीस्तव **मी डॉ.विपीन इटनकर** (भा.प्र.से.), **जिल्हादंडाधिकारी नांदेड** फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार संपूर्ण नांदेड जिल्हयाच्या हद्दीत या वर्षी श्रीरामनवमी उत्सव संदर्भात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

१. श्रीरामनवमी लोक मोठया प्रमाणात एकत्रित येऊन साजरी करतात. परंतू यावर्षी कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी लोकांनी एकत्र न येता साधेपणाने आपआपल्या घरी श्रीरामनवमी उत्सव साजरा करणे अपेक्षीत आहे.

२. दरवर्षी श्रीरामनवमी साजरी करतांना संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतू कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव पाहता सर्व धार्मिक स्थळे बंद ठेवण्यात आली असल्याने मंदिरात पूजा अर्चा व दर्शनासाठी जाता येणार नाही. तसेच यावर्षी मंदिरात भजन, किर्तन, पठण इत्यादींचे किंवा कोणत्याही प्रकारे धार्मिक, सांस्कृतिक अथवा सामाजिक कार्यक्रमांचे सार्वजनिक आयोजन करण्यात येऊ नये.

३. मंदिरामधील व्यवस्थापक /विश्‍वस्त यांनी शक्य असल्यास दर्शनाची ऑनलाईन सुविधा, केबल नेटवर्क, वेब साईट व फेसबुक इत्यादी द्वारे उपलब्ध करून द्यावी.

४. श्रीरामनवमीच्या उत्सवानिमित्त कोणत्याही प्रकारे प्रभात फेरी, मिरवणुका काढण्यात येऊ नयेत.

५. कोवीड-१९ च्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महानगरपालिका, पोलीस प्रशासन, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरू होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करणे बंधनकारक राहील.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा समुह, भारतीय दंड संहिता १८६०, साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, मधील तरतुदी नुसार

शिक्षेस पात्र राहील. परंतु आदेशाची अंमलबजावणी करताना सदभावनेने केलेल्या कृत्यासाठी कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही केली जाणार नाही.

हे आदेश आज दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात आले आहेत.

स्वाक्षरीत/-
(डॉ.विपीन इटनकर) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, नांदेड.

**प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,नांदेड
३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधीक्षक, नांदेड
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. विद्युत भवन, नवा मोंढा, नांदेड.
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड.
७. उपविभागीय दंडाधिकारी नांदेड, कंधार, देगलूर, धर्माबाद, बिलोली, भोकर, हदगाव, किनवट.
८. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन नांदेड.
९. सर्व तहसीलदार नांदेड जिल्हा.
१०. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड.
११. अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रूग्णालय, विष्णुपूरी, नांदेड.
१२. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
१३. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
१४. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बॅंक, नांदेड
१५. जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड
१६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद नगरपंचायत/नांदेड जिल्हा
१७. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, नांदेड

(डॉ.विपीन इटनकर) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, नांदेड.